


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA




vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार ५ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २०२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# चिंचोली माळीची भूमीगत नाली मुंबईच्या विधासभेत पर्यंत पोहोचली !

## भाजपच्या रमेश आडसकर गटाची ग्रामपंचायतीवर सत्ता असताना भाजपच्याच आमदारांची तक्रार !

## केज तालुक्यात भाजप ✕ भाजप — आ. नमिता मुंदडा यांनी विचारला अतारांकित प्रश्न




**दैनिक वादळ वार्ता**
**केज/गौतम बचुटे**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील भूमिगत नाली बांधकामाची ग्रामस्थांकडून तक्रार होताच मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी या प्रश्नी विधान सभेत अतारांकित प्रश्न उपस्थित केल्याने त्याची चौकशी करण्याचे आदेश ग्रामविकास विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत. केज तालुक्यातील चिंचोली माळी ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच सौ. रोहिणी देशमुख या भाजपचे जेष्ठ नेते रमेश आडसकर यांच्या गटाच्या आहेत. सरपंच सौ. रोहिणी सुनील देशमुख यांनी प्रभाग क्र. एक मध्ये पंधराव्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून भूमिगत नालीचे बांधकाम केले आहे. मात्र या भूमिगत गटाराचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने त्याची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केल्यामुळे आमदार सौ. नमितातार्इ मुंदडा यांनी त्यांच्या पत्राद्वारे दि.२० नोव्हेंबर २०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्याकडे केली होती. दरम्यान विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शून्य प्रहारात आमदार नमिता मुंदडा यांनी तारांकित प्रश्न क्र. ७८६९४ द्वारे चिंचोली माळी ग्रामपंचायतीने केलेल्या भूमिगत नाली बांधकामाच्या निकृष्ट दर्जाच्या कामा बाबत प्रश्न उपस्थित करून ग्रामपंचायतीच्या निकृष्ट कामाची विधासभेत चर्चा केली. त्या नुसार ग्रामविकास विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी पत्राद्वारे चिंचोली माळी ग्रामपंचायतीने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून त्यांनी केलेल्या बंदिस्त नाल्याचे कामा बाबत सदरील नालीचे बांधकाम सुरु आहे, हे खरे आहे काय ? दि. २० नोव्हेंबर २०२३ रोजी निवेदनाद्वारे काम निकृष्ठ दर्जाचे करण्यात येत असल्याची तक्रार नागरिकांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे का ? आमदार नमिता मुंदडा यांनी मागणी केल्या प्रमाणे चौकशी करण्यात आली आहे काय ? चौकशीत काय निष्पन्न झाले ? आणि तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली नसेल तर काय चौकशी केली ? नसेल तर त्याच्या विलंबाची कारणे. याची सविस्तर माहिती मागविली असल्याने केज

## अंबाजोगाई येथील लोक न्यायालयात अनेक तुटणारे संसार पुन्हा जुळले

**वादळवार्ता/गेवराई**

अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय व. स्तर अंबाजोगाई येथे दिनांक ०३ मार्च रविवार रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आलेले होते. राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये दाखलपुर्व व प्रलंबीत दिवाणी व फौजदारी १४५९ प्रकरणे मोठ्या संख्येने निकाली निघाल्याचा उच्चांक केला आहे. तसेच सदर प्रकरणांत रू. ३०६६३९२१/- इतकी रक्कम वसूल झाली. सदर लोकन्यायल्यात दोन प्रकणात घटस्फोट होण्याऐवजी दोन्ही पक्षकारांना समजावून सांगून मा.न्यायाधीश श्री.बोरफळकर साहेब व श्री वाघ साहेब यांनी दोन प्रकरणात महिलेस तिचे पती सोबत नांदावयास पाठविले, दोन्ही प्रकरणातील पक्षकार पती व पत्नी यांचा सत्कार न्यायाधिश यांनी केला व पतिपत्नी याना एकमेकास पेढा भरविण्यास सांगितले. सदर राष्ट्रीय लोक अदालत यशस्वी करणेकरीता येथिल मा. दिपक द. खोचे, जिल्हा न्यायाधीश-१, मा. संजश्री जे. घरत, जिल्हा न्यायाधीश-२, मा. विक्रमादित्य कि. मांडे, जिल्हा न्यायाधीश-३, मा. जयश्री एस. जगदाळे दिवाणी न्यायाधीश व स्तर, मा. माणिक ये. वाघ, सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, मा. परेश आर. वागडोळे, २रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, मा. जुबेर जाफ्फर खॉन, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मा. नागनाथ च. बोरफळकर, २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मा. सचिन दु. मेहता, ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मा, बालवीर एन. गोडबोले, ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तसेच अंबाजोगाई वकील संघाचे ऍड.ए. बी. कवडे, ऍड. एम.आर,सुगरे, सचिव वकील संघ,ऍड. एस.एन. केंद्रे,उपाध्यक्ष वकील संघ, बी.ए. पुरी,ग्रंथपाल वकील संघ, श्री. व्ही. बी.भुरे सहसचिव, वकील संघ, व सर्व विधीज्ञ अंबाजोगाई तसेच अधिक्षक व न्यायालयीन कर्मचारी यांच्या अथक परिश्रमाने सदरचे लोकन्यायालय यशस्वीरित्या पार पडले.

## आरक्षणाने नाही तर डॉ आंबेडकरांनी दिलेल्या तथागताच्या धम्माने आपल्याला अजरामर केलं-डॉ राजरत्न आंबेडकर

**वादळवार्ता/किल्ले धारूर**

३ मार्च रविवार रोजी मोंढा मैदान धारूर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांच्या नेतृवाखाली हजारो धम्म उपासकांच्या उपस्थित भव्य तिसरी बौध्द धम्म परिषद दिमाखात पार पडली . यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पंचशील ध्वजाचे ध्वजारोहन मान्यवरांच्या हस्ते करून धम्मरॅली काढण्यात आली ,तथागथ भगवान गौतम बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून भिखूसंघाला अभिवादन करण्यात आले. प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ राजरत्न आंबेडकर होते



त्यांनी धम्माची गरज आणि धम्म चळवळी बाबत मोलाचे मार्गदर्शन करत या देशाची ओळख जगात फक्त बुद्ध आणि आंबेडकर यांच्या नावानेच होत असल्याचे प्रतिपादन करून आरक्षणाच्या तुलनेत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिलेल्या धम्माने आपल्या जीवनाचं सोनं केल्याचं सांगितलं धम्मपरिषदेचे अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी धम्मपरिषद आयोजित करण्याचा प्रमुख उद्देश धम्म प्रसार असल्याचे सांगत प्रत्येकांने धम्माचे आचरण केल्याशिवाय दुसरा पर्याय नसून आता धम्म रक्षण ही आपली जबाबदारी आहे असे आवहान केले अतिशय आनंदात पार पडलेल्या हजारो उपासकांची उपस्थिती सह तहसीलदार कांबळे साहेब पोलीस निरीक्षक वागमोडे साहेब पोलीस निरीक्षक आमन शिरसट सह अनेक मान्यवार उपस्थित होते .मुख्य आयोजक सनी गायसमुद्रे यांच्यासह विजय गायसमुद्रे, भागवत गायसमुद्रे , आकाश गायसमुद्रे , अमोल शिरसाठ ,तुषार भालेराव, अनिल गायकवाड , श्रीपती ओव्हाळ, सुखदेव चोपडे ,राजेश सोनवणे, डोंगरे, राकेश शिरसट, रवी गायसमुद्रे ,महादेव गायसमुद्रे , सचिन डावकर यांच्या सह अनेकांनी परिषद यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## सरस्वती प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी तुकाराम डोंगरे

**वादळवार्ता/किल्ले धारूर**

धारूर शहरातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ज्ञानप्रसारक शिक्षण संस्थेच्या सरस्वती प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी येथील आदर्श शिक्षक तुकाराम केरबा डोंगरे यांची नियुक्ती संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. नुकताच पदभार त्यांनी स्वीकारला आहे.

शहरातील सरस्वती प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक काशिनाथ दळवे हे सेवानिवृत्त झाल्याने रिक्त झालेल्या मुख्याध्यापकपदी येथील तुकाराम केरबा डोंगरे यांची नियुक्ती ज्ञान प्रसारक संस्थेने केली आहे.

त्यांची मुख्याध्यापक पदी नियुक्ती झाल्याने संस्थेचे सचिव तथा माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक जगदीश तोष्णीवाल ,सेवानिवृत्त मुख्याध्यापक काशिनाथ दळवे सर्व कर्मचारी यांनी त्यांचे स्वागत सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

सत्कार प्रसंगी तुकाराम डोंगरे म्हणाले संस्थेने माझ्यावर खूप मोठी जबाबदारी



दिली असून शाळेच्या प्रगतीसाठी सर्वांना सोबत घेऊन चांगले कार्य करणारा असून विद्यालयाच्या भरभराटीसाठी परिश्रम घेणार आहे

त्यांच्या या नियुक्तीबद्दल पत्रकार तथा आदर्श शिक्षक नाथा ढगे, संस्थेचे संचालक श्रद्धानंद तोष्णीवाल सहशिक्षक रवी कुंभार,रमेश शिनगारे, अशोक तळसकर, वसंत शिंपले, प्रसाद कुलकर्णी, रंगनाथ शिंदे, राठोड सर, आनंद कांकळ, संतोष कसपटे, बाळासाहेब मुंडे,अमर शुक्ला, विजय काळे, गणेश वरकले, चरखामॅडम, बोबडे मॅडम मुंडे मॅडम, काळे मॅडम, उगले मॅडम इत्यादींनी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## श्री क्षेत्र अश्वत्थलिंग येथील महाशिवरात्री महोत्सवाचा दि.२ मार्च पासून उत्साहात प्रारंभ

## सांगता सोहळ्याला जरांगे पाटील यांची उपस्थिती

**वादळवार्ता/गेवराई**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान येथील महाशिवरात्री महोत्सव प्रित्यर्थ अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचा शुभारंभ दि.२ मार्च शनिवार रोजी विनापूजनाने व विधीपूर्वक मोठ्या उत्साहात झाला.या सप्ताह सोहळ्याची जय्यत तयारी केली असून



सप्ताह सोहळ्यातील किर्तनाचा लाभ घेण्यास भाविक-भक्तांची गर्दी होत आहे.या सप्ताह सोहळ्याचा सांगता समारंभ महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे दि.९ मार्च शनिवार रोजी मठाधिपती गुरुवर्य महंत ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज यांच्या काल्याचे किर्तनाने व महाप्रसादाने होणार आहे.या कार्यक्रमाला संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. जरांगे पाटील यांच्या आगमनाचे नियोजनाच्या पार्श्वभूमीवर दि.३ मार्च रविवार रोजी पिंपळवंडी




येथील श्री.सोमेश्वर मंदिरात महंत महादेवानंद भारती महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत परिसरातील नागरिकांची बैठक घेण्यात येऊन जरांगे पाटलांच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली.

## सिरसदेवीत दोन ठिकाणी चोरी, चोर सिसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

**वादळवार्ता/गेवराई**

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथे दोन किराणा दुकानात चोरी झाल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली आहे.तसेच चोर सिसिटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. सिरसदेवीतील गडी माजलगाव महामार्गांवर असलेले विठाई किराणा दुकान व जय हनुमान किराणा या दुकानात चोरी झाली आहे ही घटना काल दि.०४/०३/२०२४ आज सकाळी उघडकीस आली आहे. सविस्तर माहिती अशी कि,अदित्य विठ्ठलराव थोपटे, वय-२५ वर्ष, व्यावसाय किराणा दूकाण, रा. अर्धमसला गेवराई, सिरसदेवी फाटा येथे होलसेल किराणा मालाचे दुकाण आहे. तसेच शंकर अनंत गायकवाड वय ३० वर्षे, व्यवसाय किराणा दुकाण, रा. डीग्रस, ता. गेवराई, जि. बीड यांचे जय हनुमान किराणा मालाचे होलसेल दूकाण असून ते थोपटे यांच्या दुकाणा पासून २०० मिटर अंतरावर आहे. काल दिनांक ०३/०३/२०२४ रोजी विठाई किराणा हे नेहमी प्रमाणे रात्री ०९.०० वा सुमारास दुकाणचे शटरला कुलुप लावून बंद करुन म गावी अर्धभसला गेले त्यानंतर दुसऱ्या दिवशी दि. ०४/०३/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा दुकाणावर थोपटे यांनी दुकाणाचे शटरचे कुलूप उघडले आणी दुकाणात गेल्यावर दुकाणात उजेड पडलेला दिसला दुकाणाच्या छताकडे थोपटे यांनी बघीतले तेव्हा त्यांना दुकाणाचे वरचे पत्रे उचकटलेले दिसले आणि दुकाणातील सामान सर्व अस्त व्यस्त पडलेल दिसले. त्या वेळी दुकाणातील सामानाची पाहणी केली असता त्यांना दुकाणातील गल्यातील २५००० रु रोख रक्कम ठेवलेली दिसली नाही. त्यानंतर त्यांनी दुकाणात ईतरत्र पाहीले असता दुकाणात ठेवलेले काजु पाकिटे , बदाम चे पाकिट, अंजीर पॉकेट किमंती ५००० रु चे असे एकुण ३०,००० रु माल चोरी गेल्याचे दिसले तसेच नंतर त्यांनी आजु बाजुला विचारपुस केली असता तेव्हा त्यांच्या जवळील जय हनुमान



किराणाचे मालक शंकर अनंत गायकवाड हे आले व त्यानी थोपटे यांना सांगीतले की माझे जय हनुमान किराणा दुकाणातील चोरी होवुन माझे दुकाणातील ३२००० रु रोख, डीव्हीआर कॅमेरा इलायची पॉकेट गल्यात ठेवलेले पॉंकेट त्या मध्ये पॅन कार्ड एटीएम कार्ड, गाडी चे आर सी बुक (MH२३-BC २२७७) व लायसन्स असे एकुण ५००० रु चा माल चोरी गेला आहे तसेच चोर सिसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे तसेच दोन्ही दुकानातील एकूण रोख रक्कम ६७००० हजार रुपये चोरी गेले आहेत. थोपटे व गायकवाड यांनी चोरी झाले बाबत इतरत्र चौकशी केली असता त्याचा मित्र अर्जुन मुळे, वय ३४ वर्ष, रा. ह. मु. शिरसदेवी मुळ पत्ता टाकळी ता गेवराई, जि. बीड यांनी येऊन सांगीतले की रात्री दि.०४/०३/२०२४ रोजी मध्यरात्री ०२.२५ ते २.३५ वा च्या दरम्यान त्याला पाढऱ्या रंगाची स्विष्ट डीझायर गाडी मोहीते हॉस्पिटल येथे संशयईत उभी असलेली दिसली तीचा नं टीएस ०९ असा आर्धवट नंबर दिसला व त्यानंतर तो तेथून निघून गेला असल्याचे त्याने संगीतले आहे. त्यानंतर थोपटे यांनी पोलीसांना फोन व्दारे माहीती देवून बोलविले असता पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी करुन मोहीते हॉस्पिटल येथे लावलेले सीसीटिव्ही केमेरे चेक केले त्यामध्ये दि. ४/३/२०२४ रोजी मध्य रात्री ०२.२५ वा दरम्यान दोन गाड्या त्या पैकी एक पाढऱ्या रंगाची स्विष्ट डीझायर व दुसरी देखील पाढऱ्या रंगाची स्विष्ट डीझायर गाडी थांबलेली दिसत आहे. कॅमेऱ्यात दिसणाऱ्या दोन्ही पांढऱ्या रंगाच्या स्विष्ट डीझायर गाड्यावर आदित्य विठ्ठलराव थोपटे यांना संशय आहे.तसेच अज्ञात स्विफ्ट डिझायर गाडीमधून आलेल्या चोरट्या विरोधात तलवाडा पोलीस स्टेशनला फिर्याद दिली आहे.तसेच अनेक दिवसापासून सिरसदेवी परिसरात अनेक चोरीच्या घटना घडत आहेत कोणाचे जनावरे चोरी जात आहेत तर कोणाच्या शेतातील विद्युत पंप चोरी जात आहेत यामुळे या चोरांना पकडण्याचे आव्हान तलवाडा पोलिसा समोर उभे राहिले आहे.

## संपादकीय

# राईट टू एज्युकेशन ॲक्ट: का करते दुजाभाव?

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम- २००५ या कायद्याअंतर्गत दि.५ मार्च २००७ साली राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग म्हणजेच एनसीपीसीआर अर्थात नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राईट्स याची स्थापन करण्यात आली. हा आयोग महिला व बाल विकास मंत्रालयांतर्गत कार्यरत आहे. या आयोगाशी समांतर संपूर्ण देशात आरटीई- राइट टू एज्युकेशन ॲक्ट- २००९ लागू करण्यात आला आहे. त्यात ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीने शिक्षण दिले जावे, अशी तरतूद केली आहे, मात्र क्रमिक पुस्तकें व गणवेश एसटी आणि एससी जात संवर्गातील मुलांनाच दिले जातात. इतर मागास व बिगर मागास संवर्गातील मुलांना वगळून वंचित ठेवले जात आहे. मग कुठे गेला बालहक्क कायदा? असा सवाल करण्यास जनतेला भाग पाडले जात आहे, हे या आयोगापुढे खरे आव्हान म्हणावे लागेल. याविषयीची अभ्यासपूर्ण सखोल माहिती अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी यांच्या शब्दशैलीतून... संपादक.

आयोगाच्या या कार्य स्वरूपात अधिनियमाचे निर्धारित प्रकार- अ) मुलांसाठीच्या संरक्षण कायद्यातल्या कुठल्याही सुरक्षा उपायांची पडताळणी आणि त्याच्या फेर तपासणीसाठी आणि प्रभावी कार्यान्वयासाठीचे उपाय सुचविणे आणि केंद्र सरकार समोर ते सादर करण्यासाठी आणि या कामांवर लक्ष ठेवण्यासाठीचे सुरक्षा उपाय; आ) आतंकवाद, हिंसा, दंगे, प्राकृतिक आपदा, घरेलू हिंसा, एचआईवी- एड्स, चोऱ्या, दुर्व्यवहार, यातना आणि शोषण, वेश्यावृत्ती आणि अश्लील साहित्य अशा गोष्टी ज्यामुळे मुलांचे जीवन प्रभावित होते, आदी कारणांचा आभ्यास करणे व त्यावर उपाय शोधणे; इ) मुलांच्या जीवनात येणाऱ्या संकटांसंबंधीत असलेल्या गोष्टींमध्ये लक्ष घालणे व संकटात सापडलेली, परिवारांपासून हरवलेली किंवा परिवारविहीन मुले आणि तुरुंगात असलेली मुले यांच्या पुनर्वसनाचे काही उपाय शोधणे; ई) समाजाच्या विभिन्न विभागांतील मुलांच्या अधिकारांचा व साक्षरतेचा प्रचार करणे आणि त्यांच्यासाठी असलेल्या या अधिकारांच्या सुरक्षा उपायांची त्यांना जाणीव करुन देणे; उ) केंद्र सरकार किंवा कुठलेही राज्य सरकार किंवा इतर आधिकारांच्याअधिपत्या खाली येणारी बाल सुधारगृहे, कुठलीही शैक्षणिक संस्था यांवर लक्ष ठेवणे, त्यावर लक्ष ठेवण्याची कारणे शोधणे किंवा मुलांच्या कोणत्याही राहण्याच्या ठिकाणांवर लक्ष ठेवणे; जेथे मुलांना सुधारण्यासाठी किंवा संरक्षणासाठी ठेवून घेतले जाते. ऊ) मुलांच्या अधिकारांच्या उल्लंघनाची चौकशी आणि अशा मामल्यांमधील कार्यवाही सुरू करण्याचे उपाय आणि स्वप्रेरणेशी संबंधित मामल्यांची सूचना. ए) मुलांना अधिकारांपासून वंचित आणि त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन. ऐ) मुलांच्या संरक्षण आणि विकासाच्या कायद्यांचे गैरप्रकार. ओ) गैरनीती निर्णयांची मते, दिशानिर्देश, त्याबद्दलची मते, मुलांच्या विकासाची हमी आणि अशा मुलांची सोडवणूक. औ) अशा मामल्यांना योग्य अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अथवा मांडणे. अं) येणाऱ्या संधींचा आभ्यास करण्यासाठी, अन्य अंतरराष्ट्रीय उपकरणे आणि अस्थित्वात असणाऱ्या योजनांचे वेळोवेळी फेरविचार करण्यासाठी, मुलांच्या हक्कावर अधारित इतर घडामोडी, मुलांच्या हिताकरीता व त्यांच्या विकासात मदत देण्यासाठी; अः) मुलांच्या हक्काच्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांचा, योजनांचा अभ्यास करणे व त्या व्यवहारांचे अनुपालन करणे. मुलांवर अधारीत असलेल्या योजनांच्या कोणत्याही मुद्द्यांवर चौकशी करणे, त्यावर आलेख तयार करणे आणि मुलांच्या हक्काच्या बाल अधिकार कायद्यावर टिपण्णी करणे; क) मुलांच्या कामावर गंभीरतेने विचार करणे, मुलांसाठी काम करणाऱ्या संस्था व सरकारी खाते यांना पाठींबा देणे; ख) मुलांच्या अधिकारांबद्दल सुक्ष्मज्ञान किंवा सर्व माहितीचा प्रसार करणे; ग) मुलांच्या महितीचे संकलन व चौकशी करणे; घ) मुलांच्या हक्कांची माहिती शाळांच्या आभ्यासक्रमांमध्ये, शिक्षक प्रशिक्षणांमध्ये आणि मुलांच्या व्यक्तिगत शिक्षणामध्ये प्रसारित करणे; असे आहेत.

आयोगाच्या संरचनेत ३ वर्षांच्या कालावधीसाठी केंद्र सरकारद्वारे खालील सभासदांचा समावेश करण्यात येतो- १) अध्यक्ष, जो प्रसिद्ध असेल आणि मुलांच्या विकासासाठी खास काही काम केलेले असेल. २) शिक्षणक्षेत्रात, मुलांचे आरोग्य, विकास, किशोर न्याय, टाकलेल्या वा दुरावलेल्या मुलांबद्दल काळजी असणारे, दिव्यांग- अपंग, बाल कामगार, बाल मनोविज्ञान आणि मुलांसाठीचे कायदे जाणणारे, याबाबत अनुभव, प्रसिद्धी, अखंडता, स्थैर्य आणि क्षमता असलेले ६ सभासद असतील. ३) सचिवालय सदस्य, जो संयुक्त सचिवाच्या खालोखाल नसेल. ४) वयोमर्यादा ही अध्यक्ष यांसाठी ६५ वर्षे तर सदस्यांसाठी ६० वर्षे आहे. ५) पुनर्नियुक्ती दोन पेक्षा जास्त वेळा नियुक्ती करता येत नाही. या आयोगाला खालील सर्व सिव्हील कोर्टाचे आणि खासकरून पुढील मुद्द्यांवर आधारीत हक्क असतील: अ) भारताच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तिवर शपथ लादणे आणि ती लागू करणे; आ) कोणत्याही दस्ताऐवजांचा शोध व त्याचे उत्पादन; इ) कायदेशीर बाबी व साक्षींची मागणी करणे;

# भावगूंफण

समीक्षा

'भावगूंफण' हा कवी अरुण आहिरे यांचा कविता संग्रह वाचला. त्यातील ज्योत, नागावलेला समाज, कमवू आणि शिकू, ध्येय कुटूंब नियोजन, प्रदूषण, लुटेरे, शाळेत येऊ द्या की, भारतरत्न, समस्या पाण्याची, बाय बाय गुटखा, धर्म निरपेक्षता, नशा, फार विषारी, नोटबंदी, राजकारण, बहुमोलाची ल्येक आता वाचवा रं, नवे युग, युवकांचा स्वामी, होऊ दे सुवर्ण प्रभा, राजकारण्यांनो भानावर या ह्या साऱ्या कवितांमध्ये समााजाचे प्रतिबिंब आपणांस उमटलेले दिसून येते. कवी अरुण आहिरे हे संवेदनशील आणि जागरुकतेचे भान असलेले कवी आहेत. त्यांच्या बऱ्याच कवितांमध्ये समाजासाठी प्रबोधनपर असे संदेश आलेले आहेत. त्यासाठी लागणारी समाज सुधारणेची तळमळ, आशावाद त्यांच्या रोमारोमांत ठासून भरलेला आहे. 'सारे विश्वच आपुले घर' या उक्ती प्रमाणे वागणारा हा कवी आदर्शवादी विचार देणारा आहे. समाजाला अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा वाटसरु आहे. त्यांच्या कविता वाचतांना वाचकाला याची प्रचिती येते. नागवलेला समाज या कवितेत कवी अरुण अहिरे म्हणतात - 'जुन्या रुढींनी अंधश्रध्दांनी आधीच समाज मागासलेला' सारा समाज नागवला, सारा समाज वेडावला. चंगळवादाचा फायदा घेत, राजकारणी मागतात वोट, जातिभेदाचे लावतात गालबोट, चंगळवादान समाज वेडावला' समाजाची झालेली ही अवस्था पाहून कवी अरुण आहिरे व्यथित होतात. जुन्या रुढी परंपरा अंधश्रध्देने समाज कसा नागवला गेला आहे आणि राजकारणी त्यांचा कसा गैरफायदा घेतात हे या कवितेत कवी अरुण आहिरे यांनी दर्शविले आहे. समाजाने हे सारे सोडून देऊन सुधारले पाहिजे असे कवीचे म्हणणे आहे. नशा, प्रदूषण, फार विषारी अशा साऱ्या कवितांमध्ये कवी हाच संदेश देतो. धर्म निरपेक्षता या कवितेत कवी अरुण आहिरे म्हणतात, 'जाऊ विसरुन जात पात नका करु रक्तपात, नका करु भेदभाव ह्या आपणच मनाचा ठाव' हे कवितेचे कडवे राष्ट्राची एकात्मता किती महत्वाची आहे हे सांगते. लोकांनी जातपात, मोठा-लहान असा भेदभाव न करता सर्वांना समान वागणूक द्यावी. आपसांत भांडत बसण्यापेक्षा सर्वांनी एकत्र येऊन गुण्यागोविंदाने रहावे. मानाचा मोठेपणा बदलावा. म्हणजे राष्ट्राचीही प्रगती होईल. समाजाचेही हित होईल असे कवी सांगतात. कवी अरुण आहिरे हे ग्रामीण भागातील असल्याने त्यांना शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्यांची माहिती आहे. त्यांची शेती मातीशी नाळ जुडलेली आहे. घरटे, शिवार, समस्या पाण्याची, गोदावरी, नाशिक जिल्हा, सांजवेळी, पिकवू विठूचा मळा, दु:ख, बळीराजा, आता पाऊस पाड देवा या साऱ्या कवितांमधून कवीने शेती मातीचे शेतकऱ्याच्या जीवनाचे सुख दु:खाचे दर्शन वाचकाला घडविले आहे. 'बळीराजा' कवितेत कवी अरुण आहिरे म्हणतात- काळ्या रानात रानात, बळी नांगर चालवितो, हिरव सपान पाहतो, हिरव सपान पाहतो । पैसा येईल गाठीला, पिवळ करीन बेटीला, पिवळ करीन बेटीला, माझ्या धनाच्या पेटीला ॥ या ओळींवरुन बळीराजाच्या जीवनाचे व स्वप्नाचे दर्शन वाचकाला होते. तसेच बळीराजाच्या दु:खाचे दर्शनही आपणांस 'आता पाऊस पाड देवा' या कवितेत होते. कवी अरुण आहिरे यांनी नेमक्या शब्दांत ते मांडलेले आहे. 'वेध शाळेने मोठा बोभाटा केला. पाऊस मोठा होईल, आऊदाच्या सालाला, तुझ्या अवकृपेने रे बळी दुखावला, आता पाऊस पाड देवा वाचव गुराला' बळीराजाचे हे दु:ख बघून काळीज करपून जाते. वास्तवाचे भान कवीला असल्याने अनुभव घेतलेला असल्याने कवीने हे बळीचे दु:ख साऱ्या जगाचे दु:ख आहे असे सांगितले आहे. बळीराजा सुखी तर जग सुखी असे कवी सांगतो. कवीचे शेत शिवारवर भारी प्रेम आहे. हे या कविता वाचतांना वाचकाला दिसून येईल. आणि वाचक एका वेगळ्या विश्वात रमून जाईल. की अरुण आहिरे ह्यांचा हा पहिलाच कविता संग्रह असल्याने त्यात जी काही उणीव राहिली आहे ती ते निश्चित भरुन काढतील आणि यापुढे ही चांगल्या कविता लिहतील अशी अपेक्षा आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शभुेच्छा. मैत्री आहेच.

**राष्ट्रकवी, लेखक व समीक्षक - संजय मुकूंदराव निकम स. नं. 13, प्लॉट नं. 35, गायत्री नगर, मालेगांव कॅम्प, मालेगांव, जि. नाशिक, पिन कोड - 423203, मोबा. 8657488426**

# केज बसस्थानकातील पोलिस मदत केंद्र फक्त शोभेलाच का ?

## प्रवाशातून व्यक्त होतोय संताप.

वादळवार्ता/केज

केज बसस्थानक येथील पोलिस मदत केंद्र हे केवळ शोभेसाठीच आहे की काय असा प्रश्न प्रवाशांतून व्यक्त होताना दिसून येत आहे.

केज शहर हे राज्य महामार्गावरील रहदारीचे व तालुक्याचे ठिकाण आहे येथे नेहमीच प्रवाशांची गर्दी असते, शाळा, कॉलेज ची मुले, संपूर्ण तालुक्यातील खोड्यापाडयातील लोक, बाजारासाठी येणारे असे बरेच प्रवाशांची वर्दळ या ठिकाणी असते या वर्दळीचा, गर्दीचा फायदा घेऊन खिसेकापूसारखे लोक आपले काम करतात, कोणाचे पैसे चोरीला जातात, कोणाचे दागिने चोरीला जातात, गर्दीमध्ये घुसुन, गर्दीचा फायदा घेऊन चोर त्यांचे काम करतात त्यामुळे प्रवाशातून संताप व्यक्त केला जात आहे भूतकाळात अशा बऱ्याच घटना घडल्या आहेत, त्यामुळे केज बसस्थानकामध्ये पोलिस मदत केंद्राची स्थापना करण्यात आली




परंतू तेथे कर्मचारी नसतात, साधे होमगार्ड सुद्धा हजर नसतात बसस्थानकात पोलिस संरक्षण नसल्यामुळे चोर, लुटारू यांचे काम सोपे होते, आणि प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो, चोर चोरी करून जातो परंतू पोलिस मदत केंद्रात कोणीय नसते ते नेहमीच बंद असते त्यामुळे पोलिस मदत केंद्र काय फक्त शोभेसाठीच आहे का ? असा प्रश्न प्रवाशातून चर्चीला जात आहे.

### लोकनेता

लोकनेता होऊन गेला
अजून घुमतो दरारा,
चाहुदिशानी गजबजला
आजही ज्याचा भरारा.

गोपीनाथ अमर नाम
देई प्रेरनेचा मंत्र नेक,
स्फूर्ती नवचेतना
आशेचा किरण एक.

नेतृत्व असे की आजही
आठवतो रुबाब त्यांचा,
स्वच्छ मन आणि तळमळ
नेतृत्वाचा बाणा त्यांचा...

बिनघोर होतो आम्ही सारे
कारण नेतृत्व भक्कम होते,
टीव्हीवरचा चेहरा पहिला तरी
हुरुपाचे मळे फुलत होते...

लोकनायक आमचा थोर
आजही मनामनात जिवंत आहे,
स्मृती जपण्या गोपीनाथगड
सदैव प्रेरणा देत आहे...

नेऊ पुढे वारसा विचारांचा
गोपीनाथ मुंडे नाव जपू,
सत्कार्याच्या मार्गात आता
आदर्श हा अमर करू...

**जया विनायक घुगे - मुंडे
जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षिका
गावांदरा, परळी वैजनाथ, बीड. मो. नो.8788290740**

# सामवेदा लॉजिस्टिक इन्फ्रा रिसॉर्सेस प्रा. ली. कंपनीतील माल चोरी करून आग लावल्याचे पोलीस तपासात निष्पन्न.

## चोरीची घटना लपविण्यासाठी वेअर हाऊस मध्ये लावण्यात आली होती आग.

### पोलिसांनी केला महत्वाचा उलगडा.



**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

८/१/२०२४ रोजी दुपारि १.४५ वाजण्याच्या सुमारास उरण तालुक्यातील कंठवली येथे असलेल्या सामवेदा लॉजिस्टिक एन्फ्रा रिसॉर्सेस प्रा. ली. वेअर हाऊस या वेअर हाऊस मधील मालाला अचानकपणे आग लागली होती. या लागलेल्या आगीत सुमारे १७,५६,१७,५०० रुपये (सतरा कोटी छपन्न लाख सतरा हजार पाचशे रुपये )इतक्या किमतीच्या मालाचे नुकसान झाले होते. या लागलेल्या आगीचा तपास पोलीस प्रशासनांतर्फे सुरु होता शेवटी या आगीमागील खरे कारण समोर आले आहे. खरे कारण समोर आल्याने अनेकांना आश्चर्यचा धक्काच बसला आहे.

पोलीस सूत्राने दिलेल्या माहितीनुसार तसेच प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार सामवेदा लाजिस्टिक वेअर हाऊस मधील सुमारे १,९७,८२,५०० रुपये किमतीचा माल (सुपारी मालाच्या ५०० गोणी. प्रत्येक गोण ५० किलो वजनाची, एका गोणीची किंमत ३९५६५ रुपये )दिनांक ७/१/२०२४ रोजी २०:३० वा. ते दिनांक ८/१/२०२४ रोजी १.४५ वा. चे दरम्यान वेअर हाऊस मधील मालाची चोरी झाली. विशेष म्हणजे हि चोरी त्याच वेअर हाऊस मधील कामगारांनी केली असल्याचे तपासात उघड झाले आहे. शिवाय चोरीची घटना कोणाला समजू नये म्हणून कामगारांनीच वेअर हाऊसच्या मालाला आग लावल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे.

पोलिसांनी याबाबत अधिक तपास केला असता सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून कंपनीला आग लावण्याच्या अगोदर वेअर हाऊस मधील माल दुसऱ्या ठिकाणी नेत असल्याच्या संशयास्पद हालचाली दिसल्या. अधिक तपास केला असता सुमारे दोन कोटी रुपयांचे माल चोरी करून अगोदरच दुसऱ्या ठिकाणी ठेवण्यात आले व नंतर कंपनीतील (वेअर हाऊस मधील )मालाला कामगारांनी व इतर त्यांच्या साथीदारांनी जाणून बुजून आग लावली. या जाणून बुजून लावलेल्या आगीत वेअर हाऊस मधील सतरा कोटी छपन्न लाख सतरा हजार पाचशे रुपयाचे नुकसान झाले होते. सदर घटनेत वेअर हाऊस मधील मालाला लागलेली आग हि नैसर्गिक लागली नसून चोरी केलेला माल लपविण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. सदर चोरी करणाऱ्या व्यक्तीवर भारतीय दंड संहिता कलम३८०,३८१,४३६,४२७,१२०(ब ),३४ या कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक देखील करण्यात आली आहे. १) रोमेश सुर्यकांत भुवड वय २५ वर्षे, रा. उरण २) सिध्देश विजय रहाटे, वय २६ वर्षे, रा. उरण ३) किरण दशरथ पंडीत, वय ४० वषे, रा. कळवा, ठाणे ४) दिगंबर आनंदा वानखेडे, वय ५५ वर्षे, विंधणे, ता. उरण ५) संजय शंकर घाग, वय ५१ वर्षे, रा. विंधणे, ता. उरण ६) सचिन चंद्रकांत कदम, वय ३६ वर्षे, रु. वाशी नाका, चेंबूर (पूर्व), मुंबई ७) पांडुरंग उर्फ पंड्या लक्ष्मण शेरेकर, वय ३३, रु. घणसोली गाव, नवी मुंबई व त्यांचे इतर साथीदार अशी त्या चोरी करणाऱ्या व्यक्तींची(आरोपिंची) नावे आहेत. कोणालाही चोरीचे पुरावे सापडू नयेत याची पुरेपूर खबरदारी या आरोपीनी घेतली होती.चोरीचे पुरावे सापडू नयेत यासाठी वेअर हाऊस मधील केबिन व केबिन मध्ये असलेले प्रिंटर, महत्वाची कागदपत्रे, संगणक, सीसीटीव्ही कॅमेरा, डीव्हीआर व स्क्रीन, पंखे, एचपी, कंपनीचा प्रिंटर, दोन हॅन्ड ट्रॉली, इन व आऊट बॉण्डचे नोंदी असलेले रजिस्टर असे दहा लाख किमतीचे साहित्य व वस्तूना आग लावण्यात आली. मात्र सामवेदा लॉजिस्टिक वेअर हाऊस मध्ये आग लागली नसून आग लावण्यात आली होती. तसेच चोरीची घटना लपविण्यासाठी आग लावण्यात आली होती हे सत्य बाहेर येताच उरण मधील नागरिकांनी या घटनेवर मोठया प्रमाणात संताप व्यक्त केला आहे.

सदर गुन्ह्याचा (घटनेचा )तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम,पोलीस निरीक्षक (गुन्हे विभाग )सूर्यकांत कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश शिंदे, सपोनि अनुरुध्द गिजे, सपोनि शिवाजी हुलगे, पोलीस उपनिरीक्षक चंद्रहार पाटील, पोलीस उपनिरीक्षक सुशांत दुड्डे,पोलीस उपनिरीक्षक सुरज कांबळे,पोलीस शिपाई माळशिकारे यांनी केले.उरण पोलीस स्टेशनच्या या अधिकारी कर्मचाऱ्यांनी केलेल्या धाडसी तपासाचे / कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सान सभेची राज्यस्तरीय सोयाबीन-कापूस परिषद कृषी अभ्यासक डॉ.मथुरा स्वामिनाथन यांची प्रमुख उपस्थिती

## मराठवाड्याचा आर्थिककणा असलेले पीक संकटात परळीकरांची शेतकरी लढ्यास हजारो रुपयांची आर्थिक मदत



किवादळवार्ता/परळी

केंद्रात सत्तेत असलेल्या सरकारने २०१४ साली शेतक-यांस स्वामीनाथन आयोग लागू करु, उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव देऊ, सन २०२४ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करु ! अशा घोषणा करत १० वर्ष सत्ता उपभोगली पण प्रत्यक्षात मात्र शेतकरी सन्मान योजनेच्या गोडस नावाखाली २ हजार रुपये बोळवण करत याच काळात शेतीवरचा खर्च दुपटीपेक्षा जास्त वाढवला आणि शेतमालाल किफायतशीर हमीभाव देणे टाळले. महाराष्ट्र विशेषतः मराठवाडा येथील अर्थकारण हे सोयाबीन आणि कापूस सारख्या पिकावर अवलंबून असते ते पीक चुकीच्या आयात-निर्यात धोरण, हमीभावापेक्षा कमी दरात खरेदी केले गेले. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ, नैसर्गिक आवर्षणामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात घट आणि त्यात शेतमालाचे पडलेले भाव, अवर्षण, अतिवृष्टी यासारख्या आपत्ती मध्ये मिळणारी पीक विम्याची मदत न मिळणे यामुळे शेतकऱ्यांचे जगणे कठीण बनले आहे. केंद्रातील कृषी विरोधी धोरणाच्या विरोधात देशभरातील शेतकरी आज दिल्लीच्या सीमेवर दिवसरात्र लढत असून याच आंदोलनास पाठबळ देण्यासाठी सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकरी यासारख्या पीक मालावर आलेले सत्ताधाऱ्यांच्या चुकीच्या धोरणांचे सुलतानी संकट शेतकऱ्यांना ज्ञात व्हावे यासाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने गुरुवार दि ७ मार्च रोजी जिल्ह्यातील माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालय येथे राज्यस्तरीय सोयाबीन-कापूस परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेस डॉ.मथुरा स्वामिनाथन यांच्या सह किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.अशोक ढवळे, राज्याचे सचिव डॉ.अजित नवले, राज्याध्यक्ष उमेश देशमुख आदी अभ्यासकांची उपस्थिती असणार आहे. या राज्यस्तरीय परिषदेचे स्वागताध्यक्ष माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कॉ. दत्ता डाके हे असणार असून या राज्यस्तरीय परिषदेस जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष एड.अजय बुरांडे, सचिव.मुरलीधर नागरगोजे, परळी तालुका सचिव भगवान बडे, अध्यक्ष मुक्तेश्वर कडभाने यांनी केले आहे.

सर्वसामान्यांची लढ्यास मदत

अर्थ व्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या या शेती प्रश्नावर होत असलेल्या राज्यस्तरीय सोयाबीन-कापूस परिषदेसाठी परळी शहरातील शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत २६ हजार ६९१ रुपयांची रुपयांची आर्थिक मदत यावेळी शेतकऱ्यांच्या या लढ्यास दिली.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात साने गुरुजी निवासी माध्यमिक विद्यालय बीड जिल्ह्यातून सर्व द्वितीय तर केज तालुक्यातून सर्वप्रथम.

## सर्वांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत

**वादळवार्ता/केज**

राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या शाळांमधील शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी व त्यायोगे स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान दिनांक १ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत शासनामार्फत राबविण्यात आले यात, केंद्रस्तर, तालुकास्तर, जिल्हा स्तर, विभाग स्तर, राज्यस्तर अशा वेगवेगळ्या स्तरावर मूल्यमापन प्रत्यक्ष करण्यात येऊन यात गुणवत्तापूर्ण शिक्षण, तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल शाळा, पर्यावरण पूरक आनंददायी वातावरण, क्रीडा ,आरोग्य ,वैयक्तिक व परिसर स्वच्छता, कचऱ्याबाबत निष्काळजीपणाची सवय मोडून काढणे ,व्यावसायिक अभ्यासक्रम ,राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता ,विद्यार्थी बचत बँक, महावाचन चळवळ, लोकसहभाग अशा अनेक बाबींवर मूल्यांकन करण्यात आले .यात महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत चालवल्या जाणाऱ्या साने गुरुजी निवासी माध्यमिक विद्यालय केज या शाळेने केज केंद्रातून सर्वप्रथम केज, तालुक्यातून सर्वप्रथम व बीड जिल्ह्यातून सर्व द्वितीय क्रमांक पटकावला असून सदर शाळा आठ लाख रुपयाच्या पारितोषिकाची मानकरी ठरली आहे .या यशामध्ये शाळेवर व शाळेच्या गुणवत्तेवर विश्वास ठेवून ज्या पालकांनी प्रवेश घेतला त्या पालकांचे, प्रवेशित विद्यार्थ्यांचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे तसेच संस्थेचे अध्यक्ष एडवोकेट उद्धवराव कराड साहेब, उपाध्यक्ष राजेश कापसे सर, प्राचार्य श्रीमती डॉक्टर कविता गीते (कराड) मॅडम या सर्वांचे श्रेय आहे .या सर्व घटकांमुळेच हे यश शाळेला प्राप्त करण्यात आल्याची प्रतिक्रिया प्राचार्य डॉक्टर कविता गीते मॅडम यांनी व्यक्त केली, या यशाबद्दल इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसचिव श्री कैलास सोळुंके साहेब, कक्षा अधिकारी डॉक्टर कमलेश पवार सर, कक्ष अधिकारी अजित जगताप सर, प्रादेशिक उपायुक्त श्री शेख जलील साहेब, शिक्षण विभागाचे शिक्षण अधिकारी श्री .नागनाथ शिंदे साहेब, साय्यकआयुक्त समाज कल्याण बीडचे श्री. रविंद्रजी शिंदे साहेब, जालना जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यानगर सर, डाएटचे प्राचार्य श्री विक्रम सारूक सर, गटशिक्षणाधिकारी केज श्री लक्ष्मण बेडसकर साहेब, विस्तार अधिकारी श्री. सुनील केंद्रे सर श्री.दत्ता चाटे सर, श्री.लक्ष्मण बारगजे सर, केंद्रप्रमुख श्री चवरे सर, या सर्वांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.




# शहरातील रस्ते, नाले सफाई,स्ट्रीट लाइट, सिग्नल तात्काळ दुरुस्त करा अन्यथा तीव्र आंदोलन करू-जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

**वादळवार्ता/बीड**

शहरातील मुख्य ठिकाणी व शहरातील काही भागातील गल्ल्यांमध्ये व पिंगळे गल्ली जुनी भाजी मंडई या ठिकाणी रस्त्याचा आणि स्वच्छतेचा बोजबारा उडाला आहे ठिकठिकाणी कचऱ्याच्या घानेने नाल्या तुडुंब भरलेल्या आहेत शहरातील पथदिवे बंद आहेत. शहरातील सर्व सिग्नल बंद आहेत यामुळे वाहतूक कोंडीला शहरातील नागरिकांना सोमरे जावे लागत आहे शहरातील अनेक भागात दूषित पाण्याचा पुरवठा होत असून याकडे नगरपालिका दुर्लक्ष करत आहे नगरपरिषद ने ठीक ठिकाणी इमारती बांधलेल्या आहेत या इमारती ज्या कारणासाठी बांधल्या आहेत त्या कारणासाठी न वापरता त्या तशाच पडून आहेत स्टेडियम कॉम्प्लेक्स येथे बांधण्यात आलेली भाजी मार्केट खुले करून तसेच नगरपरिषदेने बांधलेल्या इतर इमारती वापरत आणाव्यात व तेथील नागरिकांना न्याय द्यावा शहरातील मुख्य चौक व शासनाच्या जागेत अतिक्रमण झाले असून या मुख्य जागा नगरपालिका विविध शासकीय कार्यालयाचे आहेत यामुळे वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होत असून नगरपरिषदेने तात्काळ हे अतिक्रमण काढावे वरील विषयासंदर्भात आठ दिवसात कारवाई करावी नसता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल या संदर्भात नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर , जिल्हा समन्वयक संजय भाई महाद्वार, उप जिल्हा प्रमुख राजेभाऊ महूवाले , जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, बीड विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे,तालुका प्रमुख गोरख सिंघन,शहर प्रमुख शेख निजाम भाई ,विनोद गुंड यांच्यासह पिंगळे गल्ली सह शहरातील नागरिकांची उपस्थिती होती



# परळीत महाशिवरात्र उत्सवाची वैद्यनाथ मंदिर परिसरात वेगाने तयारी सुरू

**वादळवार्ता/ परळी वैजनाथ**

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभु वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाची महाशिवरात्र यात्रा 8 मार्च रोजी भरणार आहे. या यात्रेनिमित्त देशभरातील विविध भागातून लाखो भाविक परळीत दाखल होतात. या महाशिवरात्र यात्रेची पूर्वतयारी वैद्यनाथ देवल कमिटीच्या वतीने करण्यात येत आहे. या निमित्ताने मंदिर व परिसरात रंगरंगोटी, दर्शन व्यवस्था आदी विविध कामे सध्या वेगाने सुरू आहेत.

वैद्यनाथ देवल कमिटीच्या वतीने महाशिवरात्र उत्सवाची तयारी सुरु करण्यात येत आहे.यावर्षी 8 मार्च रोजी महाशिवरात्र आहे. त्यानिमित्ताने देवल कमिटीच्या वतीने पारंपरिक तीन दिवसांचा उत्सव साजरा केला जातो. या मध्ये पालखी सोहळा असतो. महाशिवरात्र पर्वकाळात दर्शनासाठी देशभरातील विविध ठिकाणचे भाविक दर्शनासाठी मंदिरात येतात. महाशिवरात्र यात्रा पार्श्वभूमीवर मंदिर व परीसरात विविध कामे सुरू आहेत. या मध्ये रंगरंगोटी करण्यात येत आहे. तसेच दर्शन मंडप, दर्शन मार्ग, सुरक्षाव्यवस्था आदी दृष्टीने तयारी करण्यात येत आहे. दर्शन रांगांसाठी उत्तर प्रवेश द्वारासमोरील पायर्या वर दर्शन रांगांसाठी बॅरिकेड्स टाकण्याचे काम सुरू आहे.



दरवर्षी लाखो भाविक मंदिरात येतात. या पार्श्वभूमीवर देवल कमिटीकडून भाविकांना सुलभ दर्शन व्हावे, मंदिर प्रशासनाकडून मंदिरात आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देणे, रंगरंगोटी आदी कामे सध्या सुरू आहेत. भाविकांच्या सोयी सुविधा साठी देवल कमिटी प्रयत्न करीत आहे.

**राजेश देशमुख**
**विश्वस्त, वैद्यनाथ देवल कमिटी,परळी वैजनाथ,.**

दैंनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

वादळ वार्ता

संपादक ; अजय भांगे मो . ९४२२६६००७७

# रा.से.यो. शिबिरामुळे विद्यार्थ्यांना श्रमदानाचे आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व समजते-रमेश पोकळे

## वसंतराव काळे आणि संभाजी राजे महाविद्यालयाच्या रा.से.यो. शिबिराचे उद्घाटन संपन्न



**वादळवार्ता/बीड**

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना ज्ञान संपादन करण्याबरोबरच श्रमदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे. समाजातील तळागाळातील ग्रामीण भागातील विविध प्रश्न विद्यार्थ्यांना कळाव्यात त्यांना सामाजिक बांधिलकीचे महत्त्व समजावे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे अशा विविध शिबिरांचे आयोजन केले जाते. असे प्रतिपादन संस्थाअध्यक्ष रमेश पोकळे यांनी केले. येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम आणि कम्प्युटर सायन्स बीड आणि संभाजी राजे लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे कोळवाडी येथे रा.से. यो. विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रमेश पोकळे बोलत होते. या कार्यक्रमाला व्यासपीठावर ह. भ. प. तुळशीदास महाराज शिंदे, जेष्ठ मार्गदर्शक शिवदास आप्पा पोकळे, संस्था सचिव प्रा. गणेश पोकळे, प्र.प्राचार्य प्रा.बप्पासाहेब हावळे, सरपंच सौ.द्रौपदी वाघमारे, तलाठी खांदे मॅडम, जि. प. शाळेचे मुख्याध्यापक होले सर, यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना रमेश पोकळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना त्यांच्यातील नेतृत्वगुणांना वाव देण्यासाठी रा.से. यो. विभागाचे उत्तम व्यासपीठ आहे. अशा शिबिरांच्या माध्यमातून उद्याचा राष्ट्राचा चांगला नागरिक समाजाला मिळत असतो. असेही पोकळे म्हणाले. यावेळी ह.भ.प तुळशीदास महाराज शिंदे यांनी उद्घाटनपर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्र.प्राचार्य प्रा.बप्पासाहेब हावळे यांनी शिबीर घेण्यामागचा उद्देश याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवशंकर पटवारी यांनी केले. तर शेवटी आभार संस्था सचिव प्रा.गणेश पोकळे यांनी मानले. या कार्यक्रमाला शालेय समितीचे अध्यक्ष आबादेव ढेरे,प्रा.राजश्री महाजन, कार्यक्रमाधिकारी प्रा. भूषण मठपती,प्रा. सुहास गाढवे,प्रा. पुजा पाटील, महेश नेवडे, दीपक जाधव, इमरान पठाण, सचिन चौरे, सौ.खोसे विद्यार्थी स्वयंसेवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटोदा लोकन्यायालयात ७४८ प्रकरणे निकाली

**वादळवार्ता/पाटोदा**

पाटोदा न्यायालयात आयोजित केलेल्या लोकन्यायालयात तब्बल ७४८ प्रकरणी निकाली काढण्यात आली तर एकूण ३१ लाख पंधरा हजार ३२८ रुपयाची वसुली करण्यात आली आयोजित लोकन्यायालयाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व मा.जिल्हा न्यायालयाचे सुचनेनुसार दिनांक तीन मार्च रविवारी पाटोदा येथील न्यायालयात लोकन्यालयाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात एकुण ७४८ प्रकरणे निकाली काढण्यात आली तर एकुण ३११५३२८ रुपयाची वसुली झाली या लोकन्यायालयात प्रलंबित दिवाणी दावे पुर्व प्रकरणे, बँकेची कर्ज प्रकरणे, चेक



बाबतची प्रकरणे, ग्रामपंचायत थकबाकी प्रकरणे, घरगुती कौटुंबिक वाद, पोटगीची प्रकरणे आणि तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे हे सामोपचाराने आपसात तडजोडी ने निकाली काढण्यात आली. सदर न्यायालयात दिवाणी ७४ प्रकरणे, फौजदारी १२ प्रकरणे, बँकेचे ०९ प्रकरणे तसेच ग्रामपंचायत थकबाकी ६५३ प्रकरणे ई. प्रकरणे निकाली काढण्यात आली. फौजदारी प्रकरणात रक्कम रुपये ६०१२४५ आणि बँक व ग्रामपंचायतची थकबाकी प्रकरणात रक्कम रुपये २५१४०८३ अशी एकुण ३११५३५८रुपयाची वसुली करण्यात आली. या न्यायालयासाठी एकुण ०२ पॅनल तयार करण्यात आले होते. पॅनल क्र. ०१ वर मा. श्रीमती एस. एन. निकम मॅडम दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाटोदा, पॅनल क्रमांक ०२ वर मा. श्रीमती ए.ए. पाटील मॅडम, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाटोदा हे होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका वकील संघ पाटोदा यांचे विधिज्ञांनी मोलाचे सहकार्य केले.

# महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जंयती उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर





वादळवार्ता/बीड दि.०३-०३-२०२४ रोजी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या भिमशक्ती क्रिडा मंडळ व व्यायाम शाळा बलभीम नगर पेठ बीड आयोजित जंयती उत्सव समिती ची कार्यकारणी बैढक पार पडली या उत्सव समिती च्या अध्यक्ष पदी सागर भैय्या धन्वे तर सचिव पदी सिध्दार्थ सर जावळे यांची निवड करण्यात आली उपाध्यक्ष.रवी जाधव. सहसचिव भारत आण्णा कांबळे व तुषार इनकर.कोषाध्यक्ष. शंकर उमाप व सचिन कोकाटे कार्याध्यक्ष. रंजनिकांत वाघमारे व मुन्ना शिंदे व्यवस्थापक अभिजीत गायकवाड. कपिल ढाकणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली यावेळी कार्यकारणी जाहीर करण्यासाठी भिमशक्ती क्रिंडा मंडळाचे सर्व जेष्ठ पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते या बैढकीत बीड शहरासाठी प एक आदर्श निर्माण होईल उत्सव समितीचा आशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे यावेळी भिमशक्ती क्रिडा मंडळ व व्यायाम शाळा बलभीम नगर पेठ बीड चे सर्व जेष्ठ नागरिक.मंडळाचे सर्व पदाधिकारी. सदस्य. सर्व मित्र परिवार उपस्थित होते.

# प्रहार जनशक्ती पक्षात बीड शहरातील युवकांचा जाहीर प्रवेश

वादळवार्ता/बीड

माननीय दिव्यांग मंत्रालयाचे अध्यक्ष तथा प्रहार जनशक्ती पक्षा चे संस्थापक श्री.बच्चूभाऊ कडू यांच्या विचारांना तसेच सामाजिक तथा राजकीय कारकिर्दीला प्रभावित होऊन व प्रहार जनशक्ती पक्षा चे जिल्हाध्यक्ष विलास भाऊ काळुंके यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाला प्रेरित होऊन बीड शहरातील आसंख्य युवकांनी आज प्रहार जनशक्ती पक्षा मध्ये जाहीर प्रवेश केला व बीड चे सामाजिक बांधिलकी जपणारे सर्वांना सोबत घेऊन चालणारे संयमी युवक बालासाहेब देवगुडे यांची विलास भाऊ काळुंके यांच्या हस्ते बीड तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली तसेच रवी चौघुले यांची युवक तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली कार्यक्रमाचे



सूत्रसंचालन तसेच पक्ष कार्य वाटचाली साठी चे मार्गदर्शन श्री धनंजय साठे सर यांनी केले कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मध्ये पक्षाचे शहरध्यक्ष श्री दिपक पवार तसेच कृष्णा राठोड सर, संतोषजी बहिर,राहुलजी नाईकवाडे,अमितजी जोगदंड,रामेशजी पवार, व इतर सर्व मान्यवर तसेच बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते नवनिर्वाचित पदाधिकारया चे अभिनंदन करत जिल्हाध्यक्ष विलास भाऊ काळुंके यांनी मार्गदर्शन करत पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या व श्री धनंजय साठे सर यांनी पक्षा तर्फे सर्वांचे आभार व्यक्त करत कार्यक्रम समाप्ती जाहीर केले. व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# महाशीर मित्र-तिळसे व लहान मुलांचे सामाजिक उपक्रम व स्वच्छता मोहीम

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर/सौरभ कामडी**

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील वैतरणा नदी प्रवाहात तिळसे येथे असणारे महाशीर मासे प्रजाती अतिशय दुर्मिळ आहे. या माश्यांच्या आधिवासाचा व इथल्या समस्यांचा शास्त्रीय अभ्यास करून त्या कशा सोडवता येतील यासाठी परिसरातील पहीली ते आठवीच्या २६ मुलांनी एकत्र येऊन येथे अभ्यासाची सुरुवात केली . जुन २०२३ महिन्यापासून सुत्रबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. दर शुक्रवारी तिळसे येथे एकत्र येतात मासे कुंड परिसर स्वच्छता केली जाते. माशांच्या अधिवासाचा शास्त्रीय अभ्यास करावा म्हणून तिथे असलेल्या जैविक विविधतेच्या नोंदी घेतात. जंगलातील वाघांचं महत्व जितकं आहे तितकंच महत्त्व या माशांना गोड्या पाण्यातील परिसंस्थेत आहे. वाघांच्या रक्षणार्थ आज अनेक प्रकल्प राबवले जातात.तिळसे येथील हे मासे व त्यांच्या संवर्धनासाठी फार प्रयत्न झालेले दिसत नाहीत. आजवर परिसरातील लोकांनी यांचं जतन देवाचे मासे म्हणून केले आहे. मासे कुंडातील अस्वच्छता व इतर कारणांमुळे शेकडो मासे काही वर्षांपूर्वी मरून गेले होते. नव्या पीढीने आता माशांना वाचवण्या साठी पुढाकार घेतला पाहिजे.आज या परिसरात मोठ्या पर्यटक रोज मासे बघायला हजेरी लावतात. श्रध्दा म्हणून या माशांना खायला अनेक पाकीट बंद खाद्य पदार्थ घालतात कधीकधी बटर ,लाह्या, चपाती ,खिचडी, पोहे यांसारखे अन्न पदार्थ घालतात. अनेकदा हे पदार्थ पाण्यात तसेच साठून कुजतात. माशांच्या अन्न खाण्याच्या सवयी माणसांच्या अशा वागण्याने बदलत असून त्यांच्या जीविताला याचा नक्की धोका आहे. आपण सुज्ञपणे या परिसरात स्वच्छता ठेवली पाहिजे. माशांना अन्न पदार्थ खायला घालू नये. नाहीतर गोड्या पाण्यातील ह्या रुबाबदार सजीवाला येत्या काळात चित्रात बघायची वेळ आपल्यावर आल्याशिवाय राहाणार नाही. महाशीर मित्र (फ्रेंड्स ऑफ महाशीर) या नावाने मुलांनी आता हे अभियान सुरू ठेवण्याचा संकल्प या मुलांनी केला आहे.



दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरुपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )